# पुणे-सातारा महामार्गाची दुर्दशा

खेडशिवापूर, दि. ३ (वार्ताहर)- पुणे-सातारा महामार्गावर खड्डे पडल्याने रस्त्याची दुर्दशा झालेली आहे. अपघातात वाढ झालेली असून महामार्गावरील खड्डे त्वरीत बुजवावेत, अशी मागणी शिवसेनेचे कार्यकर्ते श्री रमेश कोंडे यांनी केली आहे.

पुणे-सातारा महामार्ग चौपदरी करण्याचे काम वेगात सुरू असून दरम्यानच्या महामार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. अनेक ठिकाणी रस्ता खडबडीत झालेला आहे.

महामार्गाची दुर्दशा झालेली आहे. हा महामार्ग चौपदरी करणाऱ्या ठेकेदाराकडे डागडुजीसाठी शासनाने सोपविला आहे. रस्त्यावरील खड्डे पावसाळ्यापूर्वी बुजविणे गरजेचे होते. परंतु पाऊस झाल्यानंतर संबंधित ठेकेदाराने कसेबसे खड्डे बुजविण्याचा प्रयत्न केला आहे.

खड्डे व्यवस्थित न बुजविल्याने संततधार पावसामुळे व वाहनांच्या वर्दळीमुळे महामार्गावरील खडी उखडल्याने खडी रस्त्यावर अस्ताव्यस्त पसरली आहे. पूर्ववत खड्डे झाले आहेत. वरवे-वेळवाडे, नसरापूर, कामथडी, कापुरहोळ, निगडे-भोंगवली, शिंदेवाडी, शिवरे दरम्यान चौपदरी रस्त्याचे काम पूर्ण झाले असून जुन्या महामार्गावरून नवीन महामार्गावर जाण्यासाठी तीव्र वळणाचा रस्ता असून या वळणावरच मोठ-मोठे खड्डे पडले आहेत.

संततधार पावसामुळे खड्ड्यांतून गढूळ पाणी साचल्याने खड्ड्यांच्या खोलीचा अंदाज येत नाही. त्यामुळे जड वाहने खड्ड्यात आपटून नादुरुस्त होत असतात. खेडशिवापूर दरम्यानच्या सेंट्रल बँकेसमोर साईडपट्टी उखडल्याने दहा फूट रुंदीच्या कड्यावरून दुचाकी वाहने घसरून अनेक जण जखमी झाले आहेत. पुणे-सातारा महामार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाल्याने वाहनांचे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असून केव्हाप्रसंगी वाहन- चालकांना प्राणास मुकावे लागेल, अशी भीती निर्माण झाली आहे.

तरी संबंधित अधिकाऱ्यांनी पुणे-सातारा महामार्ग डागडुजी न करणाऱ्या ठेकेदारांची चौकशी करावी व दरम्यानच्या महामार्गावरील धोकादायक खड्डे त्वरीत बुजवावेत, अन्यथा पुणे-सातारा महामार्गावर 'रास्ता रोको' आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसेनेचे कार्यकर्ते श्री रमेश कोंडे यांनी दिला आहे.

### अपघातास निमंत्रण

पुणे-सातारा महामार्गाच्या चौपदरी करणाची कामे काही ठिकाणी पूर्ण झाली आहेत. जुन्या महामार्गावरून नवीन महामार्गावर वाहतूक वळविण्यात आली आहे. महामार्ग चौपदरी करण्याचे काम पूर्ण होण्याअगोदरच कामथडी (वाल्हेकर वस्ती) दरम्यान खड्डे पडल्याने व पावसाचे गढूळ पाणी साचल्याने वेगात येणारी वाहने या खड्ड्यात आदळून नादुरुस्त होत असतात, तर रात्री-अपरात्री खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने अनेक दुचाकीस्वार पडल्याने जखमी झाले आहेत. जुन्या मार्गावरून नवीन मार्गावर जाणाऱ्या तीव्र वळणावर व वाल्हेकर वस्ती दरम्यानच्या रस्त्यावर धोकादायक खड्डे अपघातास निमंत्रण देणारे ठरले असून याकडे संबंधित ठेकेदाराचे दुर्लक्ष होत आहे. तरी दरम्यानच्या रस्त्यावरील खड्डे त्वरीत बुजवून नवीन रस्त्याची दुरुस्ती होणे गरजेचे आहे.

# खेड शिवापूर ते कोंढणपूर रस्त्यावरील खड्डे बुजवावेत

**खेडशिवापूर, दि. ३० (वार्ताहर)-खेडशिवापूर ते कोंढणपूर दरम्यानच्या रस्त्यावर पावसामुळे खड्डे पडले असून हे खड्डे बुजवून रस्त्याचे रुंदीकरण करण्यात यावे, अशी मागणी येथील शिवसेनेचे कार्यकर्ते श्री. रमेश कोंडे यांनी केली आहे.**

खेड शिवापूर ते कोंढणपूर व पुढे कल्याण हा रस्ता पुणे-सातारा महामार्गाला जोडलेला असून शिवगंगा खोऱ्यातील हा प्रमुख रस्ता आहे. खेड शिवापूर, श्रीरामनगर, शिवापूर, कुसगाव, रांजे, आर्वी, सणसवाडी, कोंढणपूर, रहाटवाडे, कल्याण भोरदरी, अवसरवाडीमार्गे सिंहगड किल्ला पुढे डोणजेमार्गे ानशेत किंवा पुणे असा हा प्रमुख ार्ग असून हवेली, भोर, पुरंदर या ीन तालुक्यांना जोडणारा हा रस्ता ाहे. तिर्थक्षेत्र कोंढणपूर येथील ऐतिहासिक जागृत तुकाई देवीचे ेवस्थान असून आठवड्यातील ंगळवार, शुक्रवार, आमावस्या, ौर्णिमा या दिवशी महाराष्ट्राच्या ानाकोपऱ्यातून भाविक ेवदर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर येत सतात. तसेच हा परिसर ेतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा असून पर्यटकांच्या दृष्टीने हा रस्ता सोयिस्कर आहे. खोऱ्यातील प्रमुख व्यवसाय शेती व दुग्धव्यवसाय असून या परिसरात लहान-मोठे कारखाने असल्याने वाहनांची सतत वर्दळ असते. दरम्यानचा रस्ता अरुंद असल्याने समोरासमोर येणाऱ्या वाहनांना कच्च्या रस्त्यावर उतरावे लागते. पावसाळ्यात रस्त्याच्या दोन्ही बाजूला चिखल असल्याने वाहने रुतून बसतात. यामुळे रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा निर्माण होतो.

दरम्यानच्या रस्त्यावर पावसामुळे खड्डे पडल्याने दरवर्षी पावसाळ्यापूर्वी खड्डे बुजविले जात असत. परंतु सध्या खड्ड्यातून पावसाचे गढूळ पाणी साचल्याने खड्ड्यांच्या खोलीचा अंदाज येत नाही. यामुळे मोठी वाहने खड्ड्यात आदळल्याने नादुरुस्त होतात, तर दुचाकी वाहने पडल्याने अपघात होऊन अनेकांना गंभीर दुखापतींना सामोरे जावे लागत आहे.

तरी संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे त्वरित लक्ष देऊन रस्त्यावरील खड्डे बुजवावेत व रस्त्याचे रुंदीकरण करावे. अन्यथा शिवसेनेच्यावतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा जिल्हा परिषद सदस्य सोमनाथ लांडगे यांनी दिला आहे.

This PDF file is Created by trial version of 123 PDF Creator.
Please use purchased version to remove this message.